## आंदोलनासाठी मराठ्यांचा तोच उत्साह आणि तोच जोष...

# आता कुठे जायचं..? मुंबईला जायचं! या जयघोषात भर पावसात मावळ्यांची आरक्षणासाठी मुंबईकडे आगेकूच

### सकल मराठा समाज बांधवांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

### अमोल शिंदे यांचा ग्रुप छत्रपती शिवाजी महाराज चौकातून रवाना

### आंदोलनकर्त्या मराठ्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचे घेतले आशीर्वाद



**सोलापूर : मुंबई येथे आज होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मार्गस्थ होताना मराठा आणि मुस्लिम समाज बांधव.**

**सोलापूर/प्रतिनिधी**

संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसीतून मराठा आरक्षणासाठी पुकारलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी असंख्य सोलापूरमधील मराठ्यांसह हिंदू मुस्लिम आणि दलित मावळ्यांनी गुरुवारी सकाळी शहरातील थोर महापुरुष महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, सोलापूरचे चार हुतात्मा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून खाजगी वाहनाने मुंबईच्या दिशेने कुच केले. कोण म्हणतंय देत नाही घेतल्याशिवाय राहत नाही... जितेंगे लढेंगे हम सब जरांगे... घरात बसला तो कसला मराठा.... अशा विविध घोषणांनी सभा परिसरात आणून सोडला होता.

दरम्यान, मराठा आरक्षणाकरिता (दि.२९) ऑगस्ट रोजी मुंबई मधील आझाद मैदानावरती मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे आंदोलन करणार आहेत. जुळे सोलापूर, मोदीसह शहरातील मराठे होम मैदानाजवळ एक आले शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास प्रथम अभिवादन करण्यात आले. त्यानंतर चार हुतात्मा, राजमाता अहिल्यादेवी होळकर, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपाती संभाजी महाराज या महापुरुषांना अभिवादन करून सर्व समाज बांधव मुंबईच्या दिशेने गेले आहेत.

यावेळी राजन जाधव, पुरूषत्तोम बरडे, चंद्रकांत वानकर, नाना काळे, राजन जाधव, दत्ता मुळे, प्रा. गणेश देशमुख, सचिन साळूंखे, महादेव गवळी, बापू चराटे महेश चव्हाण, सुनिल शेळके यांच्यासह मराठा बांधव मुंबईकडे गेले आहेत.

#### डोक्यावरील टोप्प्या ठरल्या लक्षवेधी

डोक्यावर निळी भगवी आणि गोल टोपी परिधान करत गळ्यामध्ये भगवा गमचा घालून छत्रपती शिवाजी महाराज की जय... भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर की जय.... जय भवानी जय शिवाजी अशा विविध घोषणा देत परिसर भगवामय करून सोडला होता. प्रत्येक थोर महापुरुषांच्या पुतळ्याजवळ पायी जाऊन आंदोलकांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

#### जिल्ह्यातून लाखो समाज बांधव रवाना

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदान मुंबई येथील मराठा आरक्षण आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातूनच नव्हे तर परराज्यातूनही मराठा समाज मुंबईच्या दिशेने रवाना होत आहे या आंदोलनात सहभागी होण्यासाठी गेल्या दोन दिवसापासून मराठा बांधव एकत्र येत मुंबईला जात आहेत तर काल गुरुवारी सकल मराठा समाजाच्या वतीने माऊली पवार व अमोल शिंदे यांच्या बरोबरीने लाखो समाज बांधव सकाळी दहा वाजता मुंबईला रवाना झाले.

#### मुस्लिम बिग्रेडचा आंदोलनात सहभाग

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी छत्रपती शिवाजी मुस्लीम बिग्रेडने जाहीर पाठिंबा दिला आहे. मराठा समाजाबांधवा बरोबर मतिन बागवान, रफिक रसबुरे, सोहेब चौधरी, राजू हुंडेकरी सह मुस्लीम बिग्रेडचे पदाधिकारी आंदोलनासाठी रवाना झाले आहे.



**सोलापूर : जुना पुणे नाका येथील राजे संभाजी महाराजांना अभिवादन करून आंदोलनासाठी मुंबईच्या दिशेने मार्गस्थ होताना मराठा आणि मुस्लिम समाज बांधव.**

## संक्षिप्त वृत्त

### तोगराळी जवळ एसटीला धडकल्याने बोलेरो मधील पती-पत्नी जखमी

**सोलापूर :** रस्त्यावर थांबलेला एसटीला बोलेरो धडकल्याने मोटारीतील पती-पत्नी जखमी झाले. हा अपघात अक्कलकोट मार्गावरील तोगराळी गावाजवळ गुरुवारी दुपारच्या सुमारात घडला. अब्दुल मेहबूब शेख (वय ४५) आणि ताजबी अब्दुल शेख (वय ३५ दोघे रा. थोरली इरण्णवस्ती सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात म्बुलन्स मधून दाखल करण्यात आले. ते दोघे केए३२-डी- ७०२० या बोलेरो मोटारीतून गुलबर्गा ते सोलापूरच्या दिशेने निघाले होते. दुपारी एक वाजेच्या सुमारास तोगराळी गावाजवळ रस्त्यावर थांबलेल्या एमएच१३-बी-९६२६ या मोटारीला पाठीमागून थकल्याने दोघेही जखमी झाले.या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### मिरवणुकीत धक्का लागल्याच्या कारणावरून तरुणास मारहाण

**सोलापूर :** राहुल गांधी झोपडपट्टी येथील कमेला जवळ मिरवणुकीत माचताना धक्का लागल्याच्या कारणावरून लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत विजय विनोद कट्टीमनी (वय १९ रा.राहुल गांधी झोपडपट्टी) हा तरुण जखमी झाला. ही घटना बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली . त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रेम जाधव, आदित्य आवळे आणि इतर दोन जणांनी मिळून त्याला मारहाण केली. अशी नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे.

### शेकोटीत भाजलेल्या वृद्ध महिलेचा मृत्यू

**सोलापूर :** साडे (ता.करमाळा) येथे शेकोटीच्या भडक्यात भाजून जखमी झालेल्या सुंदराबाई पांडुरंग मस्तुद सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना आज गुरुवारी पहाटे मयत झाल्या. १७ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास त्या थंडी वाजू लागल्याने घरात कचरा जाळून शेकोटी पेटवली होती. त्यावेळी साडीच्या पदराला आग लागून त्या भाजल्या होत्या. त्यांना करमाळा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात रोहिदास (मुलगा) यांनी दाखल केले होते. तालुका पोलीसात याची नोंद झाली आहे.

### मैंदर्गी येथे मुलीच्या मागे लागला म्हणून चाकूने तरुणास मारहाण

**सोलापूर :** मुलीच्या मागे लागल्याच्या कारणावरून एका तरुणास चाकूने मारून जखमी करण्यात आले. ही घटना मैंदर्गी (ता.अक्कलकोट) येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. चिदानंद शिवचलया पुजारी (वय २७ रा.मैंदर्गी) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात मार्तंड (भाऊ) याने दाखल केले. काल बुधवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास चिदानंद हा घराजवळ थांबला होता. त्यावेळी रामण्णा कांतप्पा पुजारी याने तु माझ्या मुलीच्या मागे का लागतो ? असे म्हणत चाकूने पोटावर मारून जखमी केले. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### भंडारकवठे येथे चक्कर आल्याने तरुण दगावला

**सोलापूर :** घरात असताना छातीत दुखून चक्कर येत असल्याने २५ वर्षीय तरुण उपचारापूर्वी मयत झाला . ही घटना भंडारकवठे (ता.दक्षिण सोलापूर) येथे आज गुरुवारी सकाळच्या सुमारात घडली. आप्पासाहेब सुभाष व्हनमाने (वय २५ रा.भंडारकवठे) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. गुरुवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास घरात असताना त्याला अचानक चक्कर येऊन छातीत दुखू लागले होते. त्यानंतर तो बेशुद्ध झाला होता . त्याला सुरेश पाटील (मामा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

### शुक्रवार पेठेत विवाहित तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर :** एका ४२ वर्षीय विवाहित इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शहरातील शुक्रवार





पेठेत असलेल्या ओंकार अपार्टमेंटमध्ये गुरुवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. सुमित राजीव अध्यापक (वय ४२, रा. ओंकार अपार्टमेंट, शुक्रवार पेठ) असे मयताचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी पाचच्या सुमारास त्याचा मृतदेह किचन रूममधील छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत सुमित अध्यापक याच्या पश्चात पत्नी, दोन मुली, आई आणि भाऊ असा परिवार आहे. तो एका खासगी रुग्णालयात ए. सी. टेक्निशियनचे काम करीत होता. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही. हवालदार खरात पुढील तपास करीत आहेत.

## १० लाखांच्या गुंतवणुकीचे आमिष; बार्शीतील महिलेची साडेनऊ लाखांची फसवणूक

**बार्शी :** गुंतवणुकीवर दुप्पट परतावा मिळेल या आमिषाने बार्शीतील एका तरुणीची तब्बल ९ लाख ४८ हजार रुपये किंमतीची फसवणूक झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित महिलेने पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.





फिर्यादी अंजली किरण काकडे (रा. गाडेगाव रोड, म्हाडा कॉलनी, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, २०२१ साली शिक्षण घेत असताना त्यांचा परिचय पंढरपूर येथील पाटील कन्स्ट्रक्शनचे मालक तेजस दत्तात्रय पाटील (रा. गादेगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर) यांच्याशी झाला. त्यांनी १० लाख रुपये गुंतवल्यास काही दिवसांत २० लाख रुपये मिळतील असे आमिष दाखवून भागीदारीत काम करु असे सांगितले.

यानंतर अंजली काकडे यांनी ०५ मार्च २०२१ ते ३१ डिसेंबर २०२२ या काळात फोनपे द्वारे ३,९७,२३८ रुपये, तसेच २० डिसेंबर २०२३ रोजी ४ लाख रुपये रोख, ०५ जानेवारी २०२४ रोजी १ लाख रुपये रोख असे एकूण ८ लाख ९७ हजार २३८ रुपये दिले. याशिवाय ५१ हजार रुपये किंमतीचा डेल कंपनीचा लॅपटॉप सुद्धा तेजस पाटील यांना दिला.

त्यानंतर वारंवार विचारणा करूनही बिल निघाले नाही, फोनला उत्तर मिळेनासे झाले. अखेरीस मार्च २०२५ मध्ये पंढरपूर येथे चौकशी केली असता पाटील यांचे ऑफिस बंद झाल्याचे व त्यांनी अनेक लोकांना फसवल्याचे समोर आले. स्वत:चे पैसे परत मागितले असता पाटील यांचे वडीलही अनेक लोकांकडून पैसे घेतले असून आम्हालाही रोज फोन येतात असे सांगून तुम्ही पोलीसात तक्रार करा असे सांगितले. एकूण ९ लाख ४८ हजार २३८ रुपयांची फसवणूक झाल्याने पीडित अंजली काकडे यांनी अखेर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. या प्रकरणी तेजस दत्तात्रय पाटील यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

## सरकारी कामात आणला अडथळा; विधी संघर्षग्रस्त बालकासह दोघांवर गुन्हा

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहरातील गणेशोत्सवानिमित्त कर्तव्यावर असणाऱ्या पोलिस कर्मचारी सोबत काही हुल्लडबाज युवकांनी हुज्जत घातली. या घटनेत फिर्यादी पोलिस कर्मचारी योगेंद्रसिंह राठोड हे दुपारच्या सुमारास रामवाडी परिसरात गस्त घालत आसताना दोन





व्यक्ती अंगातील शर्ट काढून हवेत फिरवत अश्लिल हावभाव करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर, त्यावेळी फिर्यादी राठोड यांनी त्या दोघांना तुम्ही शर्ट घाला असे बोलून त्यांना नावे विचारले असता त्यादोघांनी त्यांची नाव सांगितले. त्यावेळी त्यांना तुम्ही असे का करता विचारत असताना संशयित आरोपी संदीप जाधव याने फिर्यादी राठोड यांना तुला काय करायचे आम्ही काहीही करु, असे बोलून 'तु जास्त शहानपणा करु नको' असे म्हणत, धक्काबुक्की करुन सरकारी कामात अडथळा आणला. त्याचवेळी ईतर दोन संशयित व्यक्ती राठोड यांच्या अंगावर धावून आले. ही घटना (दि.२७) ऑगस्ट रोजी दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास, रामवाडी दवाखाना, सोलापूर येथे घडली आहे.

या प्रकरणी पोलिस कर्मचारी योगेंद्रसिंह भिमसिंह राठोड (वय ३५, नेमणूक सलगर वस्ती पोलीस ठाणे, सोलापूर शहर ) यांच्या फिर्यादीवरून संदिप अंबादास जाधव (वय २२, रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी नं. ०३, सोलापूर), दुसरा विधीसंघर्षग्रस्त बालक, आणि दत्तात्रय सिद्राम जाधव (वय- ३१, रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी नं. ०६, सोलापूर) याच्या विरोधात भा.न्या. सहिता कलम १३२,१२१ (१), ३५१ (२), ३ (५) मपोकाक ११०/११७प्रमाणे सलगर वस्ती पोलीस ठाण्यात (दि २८) ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी कुंभार करत आहेत.

## शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार खताळांवर हल्ल्याचा प्रयत्न; परिसरात तणाव



**अहिल्यानगर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार अमोल खताळ यांच्यावर संगमनेरमध्ये हल्लयाचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. एका तरुणाने हस्तांदोलन करण्यासाठी हात पुढे केला. त्याच्यासोबत हस्तांदोलन करत असताना त्याने आमदार अमोल खताळ यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न केला. यावेळी खताळ यांच्या सुरक्षा रक्षकाने त्यांचा जीव वाचवला आहे.

संगमनेर फेस्टिवलट्या उद्घाटनावेळी हा प्रसंग घडला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अमोल खताळ यांचे समर्थक मोठ्या संख्येने घटनास्थळी दाखल होत आहेत. संगमनेरचे महायुतीचे आमदार अमोल खताळ यांच्यावर गुरुवारी हल्ल्याचा प्रयत्न झाला. खताळ एका कार्यक्रमात गेले होते. तेथून परतत असताना ते नागरिक आणि कार्यकर्त्यांशी हस्तादोलन करीत होते. त्यावेळी एकाने हस्तआंदोलन करण्याच्या बहाण्याने जवळ जात हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

सुरक्षा रक्षक आणि कार्यकर्त्यांनी त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. प्रसाद अप्पासाहेब गुंजाळ (खांडगाव, संगमनेर) असं हल्ला करणाऱ्या तरुणाचे नाव असल्याचं सांगण्यात आलं आहे. या घटनेनंतर आमदार अमोल खताळ यांच्या समर्थकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. अलीकडेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात आणि खताळ यांच्यात विविध मुद्यावरून वाद सुरू आहेत. ताज्या घटनेमुळे पुन्हा वातावरण तणावपूर्ण बनले आहे.मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला आहे.

# जेलरोड पोलिसांच्या मध्यस्थीने अखेर वाद मिटला अन् आजोबा गणेशोत्सवाची सुरू झाली विद्युत रोषणाई!

### मानाचा आजोबा गणपती परिसरातील विद्युत रोषणाई गुल; हेतूपुरस्सर रोषणाई बंद केल्याचा ट्रस्टचा सुरुवातीला आरोप

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापुर शहरातील मनाचा श्रीआजोबा गणपती मंदिर परिसरास केलेली आकर्षक विद्युत रोषणाई हेतूपुरस्सर बंद केल्याने ऐन उत्सव काळात सर्वत्र अंधार पसरला. या घटनेमुळे चिडलेल्या आजोबा गणपती ट्रस्ट मंडळाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आणि विद्युत रोषणाई करणाऱ्या व्यावसायिक यांच्यात माणिक चौक येथे काहीकाळ वाद झाला. घडलेल्या घटनेची माहिती मिळताच जेलरोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती हाताळल्याने होणारा वाद विकोपाला गेला नाही. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर विद्युत रोषणाईने पूर्ववत करण्यात आली.

> ❝ डीजे बंदीचा राग व्यक्त करण्याचे हे माध्यम नाही. यांसाठी शासन आणि प्रशासन आहे. मात्र काही हेतूने आजचे हे विद्युत रोषणाई बंद करण्याचे पाप केले आहे. ट्रस्ट क्टनुसार आम्ही संबंधितांवर गुन्हा दाखल करू शकतो. त्यामुळे असे खोडसळ वागणूक ठेवून गणेशोत्सव काळात तेढ निर्माण करू नये.
>
> **-गुरुनाथ निंबाळे, विश्वस्त, श्री आजोबा गणपती**

दरम्यान,शहरात डीजे बंदीचा वाद काही केल्या थांबण्यास तयार नाही. कर्णकर्कश्य डीजे विरोधात सोलापूरवासियांनी एक लोकचळवळ उभी करत विविध प्रकारच्या आंदोलनातून डीजेचा विरोध केला जात आहे. डीजे बंदीमुळे संबंधित व्यवसायिकांवर प्रशासनाचा दबाव वाढत असल्याने सोलापुरातील सांऊड लाईट असोसिएशनने अनोखी शक्कल लढवत शहरातील विविध राजकिय, सामाजिक, क्षेत्रातील नागरिकांना आपली सेवा देणार नसल्याची शपथच घेतली असल्याचे सांगण्यात येत आहे. डीजे असोसिएशनच्या इतकंच न करता सोलापुरातील मानाचा आजोबा गणपती मंदिर परिसरास केलेली आकर्षक लाईट डेकोरेशन बंद केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.





**सोलापूर : मनाचा श्रीआजोबा गणपती मंदिर परिसरास केलेली आकर्षक विद्युत रोषणाईची सजावट बंद केल्याने वादावादी होऊन काहीकाळ तणाव निर्माण झाला होता. वाद मिटवताना जेलरोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत यांच्यासह अन्यजण.**

#### खोड्या कराल तर परिणाम भोगावे लागतील

सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाचे उत्सव अध्यक्ष सोमनाथ मेंडके यांनी या घटनेवर भाष्य करताना सांगितले की, डीजे व्यवसायिक असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना ऐन गणेशोत्सवकाळात अशा खोड्या करून, श्री भक्तांच्या भावना दुखवू नये, अन्यथा याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा प्रसारमाध्यमांसमोर दिला.